# नहूम

1 हे पुस्तक म्हणजे एल्कोश येथील नहूमला झालेला दृष्टान्त आहे. निनवे* या शहरा बद्दलचा हा शोकसंदेश आहे.

## परमेश्वर निनवेवर रागावला आहे

2परमेश्वर हा ईर्ष्यावान देव आहे परमेश्वर अपराध्यांना शिक्षा करतो परमेश्वर अपराध्यांना शिक्षा करतो आणि तो खूप रागावतो परमेश्वर त्याच्या शत्रूंना शिक्षा करतो. तो त्याच्या शत्रूंवर रागावलेला असतो.

3परमेश्वर जसा सहनशील आहे, तसाच सामर्थ्यवान आहे परमेश्वर अपराधी लोकांना शिक्षा करील. त्यांना मोकळे सोडणार नाही परमेश्वर वाईट माणसांना शिक्षा करण्यासाठी येत आहे झंझावात आणि वादळ यांच्याद्वारे तो आपली शक्ती दाखवील माणूस जमिनीवर धुळीतून चालतो, तर परमेश्वर ढगांवरून चालतो.

4परमेश्वर समुद्राला कठोरपणे बोलेल आणि समुद्र आटेल तो सर्व नद्या कोरड्या पाडेल बाशान व कर्मेल येथील समृध्द प्रदेश सुकून नष्ट होईल लबानोनमधील फुले कोमेजतील.

5परमेश्वर येईल तेव्हा पर्वतांचा भीतीने थरकाप होईल टेकड्या वितळून जातील परमेश्वर येईल तेव्हा धरणी भयभीत होऊन थरथर कापेल. एवढेच नाही तर, हे जग आणि त्यातील प्रत्येक माणूस भीतीने कापेल.

6परमेश्वराच्या भयंकर क्रोधाला कोणीही तोंड देऊ शकणार नाही त्याचा भयानक राग कोणीही सहन करू शकणार नाही त्याचा क्रोध अग्नीप्रमाणे धगधगणारा असेल. तो येताच खडक हादरतील.

7परमेश्वर फार चांगला आहे. संकटसमयी तो सुरक्षित आश्रयस्थान आहे त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्यांची तो काळजी घेतो.

8पण त्याच्या शत्रूंचा तो पूर्णपणे नाश करील पुराच्या लोंढ्याप्रमाणे परमेश्वर त्यांना धुवून टाकील अंधारातून तो त्याच्या शत्रूंचा पाठलाग करील.

**निनवे** अश्शूरची राजधानी. अश्शूरने इस्राएलचा, ख्रि. पू 722–721 मध्ये नाश केला हे नहूमच्या दृष्टान्ताचे पुस्तक आहे. नहूम एल्कोशचा रहिवासी होता.

9यहूदा, तू परमेश्वराविरुध्द कट का रचत आहेस? पण परमेश्वर संपूर्ण विनाश करणार आहे. त्यामुळे तू पुन्हा त्रास देणार नाहीस.

10भांड्याखाली जळणाऱ्या काटेरी झुडपाप्रमाणे तुझा संपूर्ण नाश होईल सुक्या काटक्या जशा चटकन् जळून जातात, तसा तुझा पटकन् नाश होईल.

11अश्शूर, तुझ्याकडून एक माणूस आला. त्याने परमेश्वराविरुध्द कट रचला. त्याने वाईट सल्ला दिला.

12परमेश्वराने यहूदाला पुढील गोष्टी सांगितल्या "अश्शूरचे लोक चांगले बलवान आहेत. त्यांच्यापाशी मोठे सैन्य आहे." पण ते मारले जातील. त्यांचा अंत होईल माझ्या लोकांनो, मी तुम्हाला त्रास दिला पण यापुढे, कधीही मी तुम्हाला त्रास देणार नाही.

13आता मी तुमची अश्शूरच्या सत्तेपासून मुक्तता करीन मी तुमच्या मानेवरचे जोखड काढून घेईन तुम्हाला बांधणाऱ्या साखळ्या मी तोडून टाकीन."

14अश्शूरचा राजा, परमेश्वर तुझ्याबद्दल पुढील आज्ञा देतो: "तुझे नाव लावायला तुझ्या वंशातील कोणीही उरणार नाही. तुझ्या दैवतांच्या देवळातील कोरलेल्या मूर्ती व धातूचे पुतळे यांचा मी नाश करीन मी तुझे थडगे तयार करत आहे. कारण तुझा विनाश लवकरच ओढवणार आहे.

15यहूदा, पाहा! पर्वतांवरून कोण येत आहे, ते पाहा! शुभवार्ता घेऊन दूत येत आहे तो म्हणतो की तेथे शांतता आहे यहूदा, तुझे खास सण साजरे कर तू ज्या गोष्टी करण्याचे वचन दिले आहेस, त्या गोष्टी कर दुष्ट तुझ्यावर पुन्हा हल्ला करुन, तुझा पराभव करणार नाहीत त्या सर्व दुष्टांचा नाश झाला आहे.

## निनवेचा नाश होईल

2 तुझ्यावर हल्ला करण्यासाठी शत्रू येत आहे तेव्हा, तुझ्या शहरातील भक्कम जागांचे रक्षण कर. रस्त्यांवर नजर ठेव. युध्दाला सज्ज हो! लढाईची तयारी कर!

2परमेश्वर इस्राएलच्या वैभवाप्रमाणेच याकोबलाही पुन्हा वैभव प्राप्त करून देईल इस्राएलच्या ऐश्वर्याप्रमाणेच याकोबचे ऐश्वर्य होईल शत्रूने त्यांचा नाश केला आणि त्यांचे द्राक्षमळे उद्ध्वस्त केले.

3त्या सैनिकांच्या ढाली लाल आहेत त्यांचा पोशाख लालभडक आहे लढण्यासाठी सज्ज होऊन उभे राहिलेले

त्यांचे रथ अग्नीच्या ज्वाळेप्रमाणे चमकताना दिसत आहेत
त्यांचे घोडे सरसावलेले आहेत.
4रथ रस्त्यांतून मोकाटपणे धावत आहेत चौकांमधून ते
पुढे–मागे कसेही पळत आहेत ते जळत्या मशालीप्रमाणे
किंवा ठिकठिकाणी तळपणाऱ्या विजेप्रमाणे दिसत आहेत.
5अश्शूरचा राजा त्याच्या सर्वोत्तम सैनिकांना बोलवत
आहे पण ते वाटेतच अडखळून पडत आहेत ते तटबंदीचे
रक्षण करण्यासाठी धाव घेत आहेत ते संरक्षक दरवाजे
खाली ओढून लावून घेत आहेत.
6पण नदीकाठची दारे उघडीच आहेत तेथून शत्रू
पुरासारखा आत शिरतो आणि राजवाड्याचा नाश करतो.
7शत्रू राणीला पकडून घेऊन जातात आणि तिच्या दासी
दु:खाने, पारव्याप्रमाणे विव्हळतात त्या छाती पिटून दु:ख
व्यक्त करतात.
8निनवे एक अशा तळ्यासारखे आले आहे, ज्याच्यातील
पाणी वाहून जात आहे लोक किंचाळतात, “थांबा! थांबा
पळून जाऊ नका!” पण त्याचा काहीही उपयोग होत
नाही.
9निनवेचा नाश करणाऱ्या सैनिकांनो, चांदी सोने लुटा
तेथे लुटण्यासारखे पुष्कळ आहे. खूप संपत्ती आहे.
10आता निनवे ओसाड झाले आहे सर्व चोरीला गेले
आहे. शहर उद्ध्वस्त झाले आहे लोकांचे धैर्य खचले
आहे भीतीने हृदयाचे पाणी पाणी होत आहे पाय लटपटत
आहेत, शरीरांचा थरकाप होत आहे, चेहेरे पांढरेफटक
पडले आहेत.
11कोठे आहे ती सिंहाची गुहा (निनवे)? सिंह–सिंहिणी
तेथे राहात होत्या. त्यांचे छावे निडर होते.
12त्यांच्या छाव्यांना आणि सिंहिणींना तृप्त करण्यासाठी
सिंहाने (निनवेच्या राजाने) खूप लोकांना मारले त्याची
गुहा (निनवे) मानवी शरीरांनी भरली त्याने मारलेल्या
स्त्रियांनी त्याची गुहा भरली.
13सर्वशक्तिमान परमेश्वर म्हणतो, “निनवे, मी
तुझ्याविरुध्द आहे मी तुझे रथ जाळून टाकीन लढाईत मी
तुझ्या ‘छाव्यांना’ ठार मारीन तू पुन्हा पृथ्वीवर कोणाचीही
शिकार करणार नाहीस तुझ्या दूतांकडून पुन्हा कधीही
लोकांना वाईट बातमी ऐकावी लागणार नाही.”

## निनवेसाठी वाईट बातमी

3 खुन्यांच्या गावाचे वाईट होईल. निनवे खोट्यानाट्यांनी
भरलेले आहे दुसऱ्या देशांतून लुटलेल्या गोष्टींनी ते
भरले आहे ते शहर ठार मारणे आणि लुटणे या गोष्टी
कधीच थांबवत नाही.
2चाबकांच्या फटकाऱ्यांचे चाकांच्या खडखडाटाचे,
घोड्यांच्या टापांचे आणि रथांच्या घडघडाटाचे आवाज
तुम्ही ऐकू शकता.
3घोडदळ हल्ला करीत आहे. त्यांच्या तलवारी तळपत
आहेत भाले चमकत आहेत. खूप माणसे मेली आहेत.
प्रेतांचे ढीग लागलेत इतकी माणसे मेली आहेत की त्यांची
गणना करणे कठीण आहे लोक प्रेतांना अडखळून पडत
आहेत.
4हे सर्व निनवेमुळे झाले निनवे, अतिशय हाव असलेल्या
वेश्येप्रमाणे आहे. तिला आणखी हवे होते तिने स्वत:ला
पुष्कळ राष्ट्रांना विकले आणि आपल्या जादूने त्यांना
गुलाम बनविले.
5सर्वशक्तिमान परमेश्वर म्हणतो, “निनवे, मी
तुझ्याविरुध्द आहे मी तुझी वस्त्रे तोंडापर्यंत वर खेचीन*.
मी तुझे नग्न शरीर राष्ट्रांना पाहू देईन ती राज्ये तुझी
बेअब्रू झालेली पाहतील.
6मी तुझ्यावर चिखल फेक करीन मी तुला तिरस्कार
पूर्वक वागवीन लोक तुझ्याकडे पाहून हसतील.
7तुला पाहून प्रत्येकाला धक्का बसेल ते म्हणतील,
‘निनवेचा नाश झाला तिच्यासाठी कोण रडणार?’ निनवे,
तुझे सांत्वन करणारा कोणीही मला भेटणार नाही हे मला
माहीत आहे.”

8निनवे, तू नील नदीकाठच्या थेब्जपेक्षा
(नो–आमोनपेक्षा) चांगली आहेस का? नाही थेब्जच्या
सभोवती पाणी होते शत्रूंपासून रक्षण करण्यासाठी त्याचा
उपयोग होई ती पाण्याचा उपयोग भिंतीप्रमाणेही करी. 9कूश
व मिसर यांनी तिला खूप बळ दिले पूट व लूब ह्यांनी तिला
मदत केली. 10तरी थेब्जचा पराभव झाला तिच्या लोकांना
कैद करून परदेशात नेले गेले. रस्त्याच्या प्रत्येक चौकात
तिच्या लहान मुलांना सैनिकांनी मरेपर्यंत मारले. प्रतिष्ठित
लोकांना, गुलाम म्हणून कोणी ठेवायचे, हे ठरविण्यासाठी
सैनिकांनी चिठ्या टाकल्या त्यांनी थेब्जच्या प्रतिष्ठितांना
बेड्या ठोकल्या.
11तेव्हा निनवे, तु सुध्दा दारुड्याप्रमाणे पडशील. तू
लपायचा प्रयत्न करशील. शत्रूपासून बचाव करण्यासाठी
सुरक्षित जागा तू शोधशील. 12पण, निनवे, तुझ्या सर्व
मजबूत जागा अंजिराच्या झाडांप्रमाणे होतील अंजिरे
पिकताच, कोणीही येऊन झाड हलविते आणि अंजिरे
त्याच्या तोंडात पडतात. तो ती खातो आणि निघून जातो.
13निनवे, तुझे सर्व लोक स्त्रियांप्रमाणे आहेत. आणि
शत्रूसैनिक त्यांना नेण्यासाठी टपले आहेत. तुझ्या देशाची
दारे, शत्रूंसाठी, सताड उघडली आहेत. दारांचे लाकडी
अडसर आगीत जळले आहेत.
14पाणी आणून साठवून ठेव. का? कारण शत्रूसैन्य
शहराला घेराव घालणार आहे. ते कोणालाही अन्न–पाणी
आत नेऊ देणार नाहीत. तुझ्या बचावाच्या जागा भक्कम
कर. विटा तयार करण्यासाठी माती मिळव. चुना कालव!

**मी तुझी वस्त्रे … खेचीन** येथे शब्दांचा खेळ आहे. हिब्रूत ह्या शब्दांचा ‘देशाचा नाश करून, तेथील लोकांना कैद करुन आपल्या राष्ट्रात नेणे’ असाही अर्थ होतो.

विटा बनविण्याचे साचे मिळव! [15]तू हे सर्व करु शकशील, पण आग तुझा संपूर्ण नाश करील. तलवार तुला कापून काढील. तुझा देश, येऊन सर्व फस्त करणाऱ्या टोळधाडीप्रमाणे दिसेल.

निनवे, तुझा विस्तार वाढत राहिला. तू टोळधाडीप्रमाणे झालीस. तू कुसरुडांच्या थव्याप्रमाणे झालीस. [16]तुझ्याकडे, निरनिराळ्या ठिकाणी जाऊन, वस्तू विकत आणणारे, पुष्कळ व्यापारी आहेत. आकाशात जेवढ्या चांदण्या आहेत तेवढे ते आहेत. ते टोळासारखे सर्व फस्त करुन निघून जाणारे आहेत. [17]तुझे सरकारी अधिकारीही असेच आहेत. टोळ थंड वेळी दगडी भिंतीवर बसतात. पण ऊन तापताच, भिंत गरम होते, तेव्हा ते दूर उडून जातात व कोठे जातात, ते कोणालाच माहीत नसते. तुझे अधिकारी अगदी असेच असतील.

[18]अश्शूराच्या राजा आणि तुझे मेंढपाळ (नेते) गाढ झोपले आहेत. ते सत्ताधारी लोक डुलक्या घेत आहेत. त्यामुळे तुझ्या मेंढ्या पर्वतांत भटकल्या आहेत. त्यांना परत आणायला कोणीही नाही. [19]निनवे, तुला खूप मार लागला आणि तुझी जखम कशानेही भरून येऊ शकत नाही. तुझ्या नाशाची बातमी ऐकताच प्रत्येकजण टाव्व्या वाजवितो सर्वांनाच त्यामुळे आनंद वाटतो. का? कारण तू त्यांना नेहमी ज्या यातना दिल्यास, त्या ते विसरले नाहीत.

# License Agreement for Bible Texts

***World Bible Translation Center***
***Last Updated: September 21, 2006***

Copyright © 2006 by World Bible Translation Center
All rights reserved.

**These Scriptures:**
- Are copyrighted by World Bible Translation Center.
- Are not public domain.
- May not be altered or modified in any form.
- May not be sold or offered for sale in any form.
- May not be used for commercial purposes (including, but not limited to, use in advertising or Web banners used for the purpose of selling online add space).
- May be distributed without modification in electronic form for non-commercial use. However, they may not be hosted on any kind of server (including a Web or ftp server) without written permission. A copy of this license (without modification) must also be included.
- May be quoted for any purpose, up to 1,000 verses, without written permission. However, the extent of quotation must not comprise a complete book nor should it amount to more than 50% of the work in which it is quoted. A copyright notice must appear on the title or copyright page using this pattern: "Taken from the HOLY BIBLE: EASY-TO-READ VERSION™ © 2006 by World Bible Translation Center, Inc. and used by permission." If the text quoted is from one of WBTC's non-English versions, the printed title of the actual text quoted will be substituted for "HOLY BIBLE: EASY-TO-READ VERSION™." The copyright notice must appear in English or be translated into another language. When quotations from WBTC's text are used in non-saleable media, such as church bulletins, orders of service, posters, transparencies or similar media, a complete copyright notice is not required, but the initials of the version (such as "ERV" for the Easy-to-Read Version™ in English) must appear at the end of each quotation.

Any use of these Scriptures other than those listed above is prohibited. For additional rights and permission for usage, such as the use of WBTC's text on a Web site, or for clarification of any of the above, please contact World Bible Translation Center in writing or by email at distribution@wbtc.com.

World Bible Translation Center
P.O. Box 820648
Fort Worth, Texas 76182, USA
Telephone: 1-817-595-1664
Toll-Free in US: 1-888-54-BIBLE
E-mail: info@wbtc.com

**WBTC's web site –** World Bible Translation Center's web site: http://www.wbtc.org

**Order online –** To order a copy of our texts online, go to: http://www.wbtc.org

**Current license agreement –** *This license is subject to change without notice. The current license can be found at:* http://www.wbtc.org/downloads/biblelicense.htm

**Trouble viewing this file –** If the text in this document does not display correctly, use Adobe Acrobat Reader 5.0 or higher. Download Adobe Acrobat Reader from: http://www.adobe.com/products/acrobat/readstep2.html

**Viewing Chinese or Korean PDFs –** To view the Chinese or Korean PDFs, it may be necessary to download the Chinese Simplified or Korean font pack from Adobe. Download the font packs from: http://www.adobe.com/products/acrobat/acrrasianfontpack.html